# दिठी




(चित्र जालावरून साभार)

सध्या समाज माध्यमांवर सुमित्रा भावे ह्यांच्या २०१९ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'दिठी' ह्या चित्रपटाबाबत बरेच लिहून येत आहे. चित्रपटाचे रसग्रहण खूपच छान आहे आणि दिग्गज मराठी अभिनेत्यांमुळे तो चित्रपट एका उच्चतम पातळीवर नेला असेल ह्यात शंकाच नाही. तो सर्वांगसुंदर चित्रपट, चित्रपटगृहात पाहण्याचा योग कदाचित लवकर येणार नाही परंतु जेव्हा कधी येईल तोपर्यंत त्याची प्रतीक्षा असेलच.

असो, त्या चित्रपटाचे शीर्षक 'दिठी' हा शब्द इतका भावला! सहसा त्याचा शब्दप्रयोग दैनंदिन जीवनात आढळत नाही. किती गोड शब्द आहे, 'दिठी'.

दिठीचा शब्दशः अर्थ दृष्टी, seeing पाहणे. मात्र ज्ञानदेवांच्या कल्पनाविलासातून काय अभिप्रेत असेल असा विचार केला तर 'दिठी' म्हणजे जणू आत्म्याचे दर्शन. Just like,
'when body sees soul'

शरीर आणि आत्मा एकमेकांचे अविभाज्य घटक आहेत. मात्र हे घटक अविभाज्य, जोपर्यंत शरीरात प्राण आहे. शरीर गतप्राण झाल्यानंतर, म्हणजेच माणसाच्या मृत्यूनंतर, शरीर जणू नश्वर असते त्यामुळे शरीर निर्जीव होते मात्र आत्मा शरीरारूपी पिंजऱ्यातून जणू मुक्त होऊन पुढील प्रवासास निघतो कारण आत्मा अमर आहे. आत्मा एक काया सोडून परकायेत प्रवेश करतो जणू, अशीच आपल्या हिंदू धर्मात भावना आणि श्रद्धा आहे.

ह्या नश्वर जगात, मृत्यू अटळ आहे. अश्वत्थामा, हनुमान, बिभीषण, महर्षी व्यास, कृपाचार्य, अश्वत्थामा, परशुराम आणि राजा बळी हे सात चिरंजीवी सोडले तर प्रत्येक व्यक्तीस मृत्यू अटळ आहे.

जन्म हा जसा नैसर्गिक तसा मृत्यूही नैसर्गिक आहे आणि ह्या जन्म आणि मृत्यूदरम्यानचा प्रवास हा एक आनंददायी सोहळा आहे, असे ओशो म्हणतात. ओशो पुढे म्हणतात जन्म हा आनंद सोहळा तर मृत्यूला दुःखाची झालर का ?

माणूस जन्माला येतो त्यावेळी किती आनंद असतो, त्याच्या आगमनाने त्याच्या आप्तेष्टांना किती आनंद होतो मग माणसाच्या मृत्यूबाबत इतका शोक का ?

बऱ्याच वेळा असे घडते, एखाद्या घरातील वृद्ध व्यक्तीचे निधन होते आणि दुखवट्याच्या कालावधीत घरात नवीन बाळ जन्माला येते. त्यावेळी मनात असे भाव येतात की गतप्राण झालेल्या प्रिय व्यक्तीच्या आत्म्याचा अंश ह्या नवजात अर्भकात परिवर्तित झाला नसेल काय ? हा योगायोग मानावा की त्या देवाघरी गेलेल्या व्यक्तीच्या शरिरातील अमर आत्म्याचा हा अंश शिल्लक राहिला नाही ना ?

When someone very near to us passes away, does it take away a part of the soul?
When someone is बorn out of us, does it also take with part of our embodiment or 'Avatar' ?

पुन्हा 'दिठी' शब्दाकडे वळूया. दिठी ही अशी अवस्था जी दुःखदायक खचितच नाही. ह्या अवस्थेत जणू नश्वर शरीराला आत्म्याचे दर्शन होते. आत्म्याचे दर्शन हा खूप असाधारण योग असू शकतो. ती अवस्था प्राप्त होणे जणू खूप विरळाच. साधारणतः माणूस स्थितप्रज्ञ होऊ शकतो, जणू सुख दुःखा पलीकडे त्याच्या भावना पोहोचतात. सुखात तो अत्यानंदात पण नसतो आणि दुःखात शोकामग्न पण नसतो, इतका स्थितप्रज्ञ भाव त्याच्या अंगी एकवटतो. परंतु 'दिठी' ही अवस्था खूप निराळी असेल.

ज्ञानेश्वरांनी ह्या अवस्थेचे यथार्थ वर्णन केले आहे.

आता आमोद सुनास जालें।
श्रुतीशी श्रवण झाले।

आरिसे उठीले ।
लोचनासी ।।

आता जणू सुगंधच सुवास झाला आहे.
श्रुतीच जणू  श्रवण करत आहेत.
डोळे हेच जणू आरसा झाले आहेत.

अपलेनी समिरपणे ।
वेल्हावती विंजणे ।
की माथेची चाफेपणे ।
बहकताती ।।

समीर म्हणजे सकाळचा सुगंधी वारा, तोच जणू वाऱ्याची झुळूक बनला आहे.
माथा जणू चंपकाप्रमाणे बहरला आहे.

जिव्हा लोधली रसी ।
कमळ सूर्यपणे विकसे ।
चकोरची जैसे ।
चंद्रमा जळे ।।

जीभ अथवा जिव्हा जणू चवीने भारलेली आहे.
कैवल्याच्या चांदण्याला भुकेला असलेला चकोर आज जणू चंद्रच झाला आहे.

फुलेची झाली भ्रमर ।
तरुणाची झाली नर ।
जालें आपुले शेजार ।
निद्राळूची ।।

फुलांवर गुंजन करणारा भ्रमर, भुंगा हाच जणू फूल झाला आहे.
तारुण्य जणू स्वतःवर लुब्ध झाले आहे.
निद्रेसाठी आपण शय्येचा उपयोग करतो आणि  ज्या उत्तम शय्येमुळे चांगली निद्रा प्राप्त होते तीच शय्या म्हणजेच bed, जणू निद्रारूपी झाले आहे.

ऐसें ज्ञान अज्ञानी झाले ।
आज्ञान ज्ञाने केले ।
ते दोन्ही वांझवले ।
दोन्ही जाली ।।

ऐसें भोग्य आणि भोक्ता ।
दिसे आणि देखता ।
हे सारले अद्वैता ।
अफूटामाजी ।।

जे खरे ज्ञान होते तेच जणू अज्ञान ठरले.
अज्ञान होते ते जणू ज्ञानरुपी ठरले.
भोक्ता जणू भोग्य झाला.
दृश्य हेच जणू दर्शक झाले.
प्रेक्षक हाच प्रेक्षणीय झाला.

डोळे जणू आरसा बनले. दोन व्यक्ती समोर आल्यावर जणू त्याच्या डोळ्यात एकमेकांना पाहताना, अश्यावेळी दोन जीव एकवटले. जणू अद्वैत अवस्था. आत्मा आणि परमात्मा एकवटले.

लहान मूल मातीपासून एक वस्तू बनवते पुन्हा ती माती एक करत नवीन वस्तू निर्माण करते ही क्रिया त्याची अखंड सुरू असते.

एका शरीरातील आत्म्याचा कार्यकाळ संपल्यावर त्या आत्म्याचा नवीन कायाप्रवेश होतो. अश्या जाणिवेची अवस्था आणि ती पाहण्याची दृष्टी लाभणे म्हणजे 'दिठी' होय.

अश्या या विविध अवस्था, जणू त्यामुळे द्विधावस्थाच संपली आणि एकात्मता अवतरली आहे. ह्या सगळ्या अवस्थांचा भास म्हणजेच जणू 'दिठी' ही अवस्था होय.

**- मनोज कुरुंभटी**